जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २७/०५/२०२६

# " गोवंश संरक्षणासाठी जामनेर पोलीस प्रशासनाची धडक कारवाई! विशेष मोहिमेत ६७ जनावरांची सुटका "

**गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल तसेच अनधिकृत कत्तलखान्यांना प्रतिबंध करण्यासाठी जामनेर पोलीस प्रशासन व नगर परिषद प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मोहीम राबविण्यात आली.**

सदर मोहीम मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव परिमंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली मा. बापू रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा विभाग, पोलीस निरीक्षक मुरलीधर कासार, सहायक पोलीस निरीक्षक स्वप्रिल शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अशोक कोकाटे व पथक (जामनेर पोलीस स्टेशन), सहायक पोलीस निरीक्षक प्रमोद कथोरे व पथक (CORT पोलीस स्टेशन), सहायक पोलीस निरीक्षक अंकुश जाधव व पथक (फत्तेपूर पोलीस स्टेशन), मा. नितीन बागुल, मुख्याधिकारी, जामनेर नगर परिषद व त्यांच्या पथकाच्या संयुक्त सहभागातून प्रभावीपणे पार पडली.

शासनाच्या निर्देशानुसार गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तल रोखण्यासाठी प्रशासनाकडून शहरातील विविध भागांत गोपनीय माहितीच्या आधारे विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. सदर मोहिमेदरम्यान घोडे पीर बाबा घरकुल परिसर, मदनी नगर तसेच इस्लामपुरा व पहूर गल्ली भागात संयुक्त पथकाने अचानक छापेमार कारवाई केली. संशयित ठिकाणांची तपासणी करून **एकूण ६,१०,०००/- रुपये किमतीची ६७ गोवंशीय जनावरे ताब्यात घेण्यात आली**.

सदर कारवाई दरम्यान एका ठिकाणी गोवंशाचे मांस आढळून आले. पोलीस प्रशासन व नगर परिषद प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून एकूण ६७ गोवंशीय जनावरे सुरक्षितरित्या ताब्यात घेण्यात आली. सदर जनावरांचे संगोपन व संवर्धन व्हावे यासाठी त्यांना जळगाव येथील गोशाळेत सुरक्षितरित्या रवाना करण्यात आले आहे. तसेच **आरोपितांविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ अन्वये जामनेर पोलीस स्टेशन येथे एकूण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

या संपूर्ण कारवाईमध्ये पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच नगर परिषद आरोग्य विभागातील आरोग्य निरीक्षक, संबंधित अधिकारी, कर्मचारी व सफाई कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून मोहीम यशस्वी केली.

**जळगाव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच शासनाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव यांनी स्पष्ट केले आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

*************************************************************************************





